admn17-18


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१५१७/९३६८

दि. ८ जून,२०१७

## परिपत्रक

**विषयः- सन २०१७-१८ ह्या शैक्षणिक वर्षांतर्गत कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांसाठी कृषी पदवी प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या व पहिल्या वर्षात प्रवेश देण्याची प्रक्रिया दि. १५/५/२०१७ पासून सुरु झालेली आहे. याअंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करण्याचा अंतिम दि. २४/५/२०१७ असा होता. यानंतर अंतरिम गुणवत्ता यादी आणि अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. मात्र कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना दि. २४/५/२०१७ पर्यंत गुणपत्रक मिळाले नसल्याने ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करता आला नसल्याच्या तक्रारी कृषी परिषद कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

या पार्श्वभूमिवर उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून सदर प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक वाढवून वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | २४/०५/२०१७ | १५/०६/२०१७ |
| २. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ३१/०५/२०१७ | २२/०६/२०१७ |
| ३. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | ०३/०६/२०१७ | २५/०६/२०१७ |
| ४. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०६/०६/२०१७ | २८/०६/२०१७ |
| | **थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | | |
| ५. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०८/०६/२०१७ | ३०/०६/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १०/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) | ०२/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ६. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | १३/०६/२०१७ | ०५/०७/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १५/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) | ०७/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | १७/०६/२०१७ | ०९/०७/२०१७ |

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| ८. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एल'** येथील कार्यपध्दतीनुसार व **परिशिष्ट 'एम'** मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा' वर फक्त) | १९ ते २३/०६/२०१७ | ११ ते १५/०७/२०१७ |
| ९. | दुसऱ्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १५/०६/२०१७ | ०७/०७/२०१७ |
| | **पहिल्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | | |
| १०. | मुद्दा क्र. ४.१७ विचारात घेऊन पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी | २६/०६/२०१७ | १७/०७/२०१७ |
| ११. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २८/०६/२०१७ | १९/०७/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ३०/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) | २१/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| १२. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ०३/०७/२०१७ | २४/०७/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०५/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) | २६/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| १३. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | ०७/०७/२०१७ | २८/०७/२०१७ |
| १४. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एन'** येथील कार्यपध्दतीनुसार व **परिशिष्ट 'एम'** मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा' वर फक्त) | १० व ११/०७/२०१७ | ३१/०७/२०१७ व ०१/०८/२०१७ |
| १५. | पहिल्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०२/०८/२०१७ | १०/०८/२०१७ |

**मा. महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**संचालक (शिक्षण)**

प्रतः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर, सूचना फलक उपलब्ध करून द्यावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, वरील सुधारीत वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी तसेच संकेतस्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध करावे.

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावे.